Vol 3 Issue 9 Oct 2013

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

## Welcome to ISRJ

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

### *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

### *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume-3, Issue-9, Oct-2013
ISSN 2230-7850

Available online at www.isrj.net

# अर्थनिर्धारणशास्त्र परंपरेतील, महानुभवांचे अर्थनिर्धारणशास्त्र व न्याय दर्शन

**श्रीधर आकाशकर**
सहाय्यक प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभाग,पुणे विद्यापीठ, पुणे.

***सारांश :***भारतीय दर्शन परंपरेतील न्यायदर्शनाचा विचार केला असता, असे दिसून येते की, महाराष्ट्रातील प्रथमतः आस्तित्वात असलेल्या, महानुभव संप्रदायावरही न्याय दर्शनाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. मात्र हा 'महानुभवाच्या अर्थनिर्धारणशास्त्रा' वर विशेषतः जाणवतो; तसाच प्रभाव त्याच्या सत्ताशास्त्र, ज्ञानशास्त्र, नितिशास्त्र इत्यादीवर पडला असेलच असे सांगता येत नाही. त्यासाठी अधिक व वेगळे संशोधन चालू आहे. मात्र न्याय दर्शन व महानुभवांचे अर्थनिर्धारणशास्त्र यातील संबंधावर काही विचार या लेखात मांडले आहेत.

***प्रस्तावना :***

भारतीय अर्थनिर्धारणशास्त्राचा विचार करता वेदांतील मंत्रांचे अर्थनिर्धारण करण्यासाठी त्याची सुरुवात झालेली दिसून येते. यातून मीमांसा दर्शनाचा उगम झाला. मीमांसा दर्शनाने वेदवाक्याचे पाच प्रकारे वर्गीकरण केल्याचे दिसते. शिवाय वेद अपौरुशेय असून, मानवनिर्मिती नसून, नित्य, अनादी, स्वतंत्र व अचूक आहेत अशी भूमिका मांडली. शब्दांचा अर्थ हा फक्त शब्दांतून तर वाक्यांचा अर्थ फक्त वाक्यांतूनच कळतो. ते समजण्याचे दुसरे कोणतेही कारण नसून, शब्दामध्ये स्वतःच्या अर्थाचे ज्ञान करून घेण्याची शक्ती असते. यालाच ते 'शब्दशक्ती' असे संबोधताना दिसतात.

पूर्वमीमांसकांखेरीज इतर वैदिक व अवैदिक दर्शनांनीही त्यांच्या प्रमाण ग्रंथांचे अर्थनिर्धारण करण्यासाठी विविध भाष्ये लिहिल्याचे दिसून येतात. भारतीय सौंदर्यशास्त्रातही कलेचे योग्य प्रकारे अर्थनिर्धारण होण्यासाठी भाष्ये लिहिल्याचे दिसून येते.

आधुनिक कालखंडात पाश्चात्त्य अभ्यासक मॅक्सम्युलर, गिल्डनर या विचारवंतांनीही वेदांचे अर्थनिर्धारण करण्यासाठी पुन्हा एक नवीन परंपरा जगापुढे आणली,[2] तर भारतीय अभ्यासकांमध्ये स्वामी दयानंद, शंकर पांडुरंग पंडित, पंडित श्री. दा. सातवळेकर इत्यादींनी वेदांचे अर्थनिर्धारण वेगळ्याा प्रकारे केल्याचे दिसून येते.

देशी भाषिकांमध्ये, संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम यांनी श्रीमदभगवद्गीता व वेद यांच्या 'अर्थाविषयी' वेगळी अनुक्रमे भूमिका भावार्थदीपिका व तुकारामांच्या गाथा यांत मांडलेली दिसते.[3]

मात्र या सर्वांहून श्रीचक्रधरांचे अर्थनिर्धारणाचे चार पदार्थ भिन्न ठरतात, कारण त्यांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष उल्लेख वरील दोन्ही परंपरांमध्ये आलेला दिसून येत नाही. म्हणून श्रीचक्रधरांनी अर्थनिर्धारणासाठी मांडलेले चार पदार्थ काको, कक्षा, प्रकरण, भावार्थ यांचे स्थान भारतीय अर्थनिर्धारणशास्त्राच्या परंपरेत असूनही ते वैशिष्ट्यापूर्ण ठरतात.

'अर्थु तो प्रकरण वशे असे देशी भाषेत म्हणणारे श्रीचक्रधर अर्थनिर्धारणशास्त्राबाबत वेगळा विचार मांडणारे दिसतात. देशी भाषिकांमध्ये 'घटना' वा 'ग्रंथ' यांचे अर्थनिर्धारण करताना येणाऱ्या अडचणींची जाणीव श्रीचक्रधरांना सर्वप्रथम झाल्याचे दिसून येते.

श्रीचक्रधरांच्या उत्तरापंथी गमनानंतर त्यांच्या शिष्य परिवारातील चर्चांमध्येही 'वचनां'चे अर्थनिर्धारण करण्यासाठी होत असल्याचे दिसून येते. यातूनच टिप्पणी, त्यातून स्थळे व त्याचा विस्तार बंदांमध्ये झाल्याचे दिसून येते.[4] चर्चा त्यातून टीका, पक्ष, पूर्णपक्ष हे भारतीय दर्शनांच्या परंपरेतून महानुभावीय भाश्यकारांनी घेतल्याचे दिसते. यावर एखादा संशोधक असेही म्हणनेल की, महानुभवांचे तत्त्वज्ञान इतर भारतीय दर्शनांपासून संपूर्ण भिन्न आहे, त्याचप्रमाणे त्यांचे अर्थनिर्धारणशास्त्रही इतर दर्शनांपासून संपूर्णपणे भिन्न आहे. यावर केलेल्या संशोधनावरून असे दिसते की, प्रत्यक्षपणे जरी आपण म्हटले की महानुभवीय पंडितांनी वापरलेले अर्थनिर्धारणशास्त्र हे भारतीय अर्थनिर्धारणशास्त्राहून भिन्न आहे, तरी ह्माइंभटांनी प्रभाकरशास्त्रा (मीमांसा)चा अभ्यास झाल्याचा उल्लखे लीळाचरित्रात आढळतो. शिवाय नागदेवाचार्यांचा शडशास्त्रां (सहा दर्शने)चा अभ्यास झाल्याचाही उल्लखे आढळतो. याशिवाय इतर अनेक आचार्य व त्यांच्या शिष्यांचा भारतीय दर्शनांचा अभ्यास असल्याचे विविध ठिकाणी उल्लेख दिसतात. त्यावर अप्रत्यक्षपणे का होईना पण महानुभवीय पंडितांनी निर्माण केलेले अर्थनिर्धारणशास्त्र हे पूर्वमीमांसा, न्यायदर्शन व इतर दर्शनांच्या प्रभावापासून दूर असल्याचे दिसून येत नाही. जसे की, उदाहरणार्थ, उपपत्ती, पक्ष, हेतू हे अर्थनिर्धारणाचे पदार्थ इतर दर्शनातही आढळतात. न्यायदर्शनापुरता विचार केला असता असे लक्षात येते की, न्यायदर्शनात उपपत्ती हे एक प्रमाण मानले आहे. शिवाय, महानुभावीय भाष्यकारांच्या आगोदर, न्यायदर्शनावरील भाष्यकारांनी, सपक्ष, विपक्ष, पक्षधर्मत्व इत्यादी संज्ञा या 'हेतू' हे 'पंचवयवी वाक्य' या अनुमान पद्धती सांगताना वापरल्याचे दिसून येते. अर्थात येथे वापरल्या गेलेल्या संज्ञांचा अभिप्रेत अर्थ व महानुभाव भाष्यकारांना अभिप्रेत अर्थ भिन्न आहे. मात्र महानुभाव भाष्यकारांनी अर्थनिर्धारणासाठी वापरलेल्या संज्ञा पूर्णतः नवीन आहेत, असे म्हणता येणार नाही, कारण त्यांच्यात नाममात्र का होईना साम्य हे आढळते. आनेराज व्यासांनी 'लक्षणरत्नाकार' मध्ये अर्थनिर्धारणासाठी 'प्रतिज्ञा' हा सर्वप्रथम अर्थनिर्धारणाचा पदार्थ सांगणे, तर दुसऱ्या बाजूला न्यायदर्शनात अनुमानाच्या मांडणीत पंचावयवी वाक्यात 'प्रतिज्ञा' हे पहिले वाक्य असणे, यात काहीतरी किमान नाममात्र का होईना संबंध असल्याचे दिसून येते. यावरून महानुभावीय अर्थनिर्धारणशास्त्र हे भारतीय दर्शनांतील अनुमान, प्रमाण, प्रामाण्य प्रणालीच्या प्रभावापासून दूर असल्याचे दिसून येत नाही.

याशिवाय महानुभावीय अर्थनिर्धारणशास्त्रामध्ये महत्त्वाचे योगदान असलेले 'लक्षणरत्नाकार' कर्ते आनेराज व्यासांबाबतचा पूर्वेतिहास पाहता, असे लक्षात येते की, त्याचे आजे 'अनंतकोची' हे देवगिरीस कोशाधिकारी असल्यामुळे व पुढे आनेराज व्यासांना, रामदेवराव जाधवांच्या, कामाईसा राणीच्या खाजगी दौलतीचा कारभार पाहण्याचा अधिकार मिळाल्याने, राजदरबारी असलेली करणाधिप हेमाद्री, पंडित बोपदेव यांसारख्या पंडितांची चर्चा प्रत्यक्ष ऐकण्यास मिळाली. त्यामुळे सिंधण यादवाच्या वेळच्या ऐश्वर्य व विद्वतेच्या गोष्टी, संगीत रत्नकाराचा कर्ता शार्ङवार्ङ्देव व धर्माध्यक्ष भट्ट वाद्रींद्र यांची स्तुतिस्तोत्रे ही यांच्या कानावर पडली असल्यास नवल नाही. याशिवाय असलनंदाचा (इ.स.1247–2260) इत्यादी तर्क न्यायावरील गाजलेले ग्रंथ त्यांच्यासारख्या पंडिताच्या पाहण्यात आले असतील. निदान अल्लाउद्दीनच्या स्वारीपूर्वीचे देवगिरीत भरणारे राजदरबाराचे वैभव व पंडितांचा होणारा सन्मान, हे आनेराजांनी पाहिलेले होते. त्यामुळे अशा वातावरणात ते वाढल्याने त्या काळातील प्रतिबिंब त्यांच्या ग्रंथाच्या स्वरूपात दिसले. त्यामुळे अशा सर्वप्रकारे महापंडितांच्या चर्चा, वादविवाद, धर्मनिर्णय इत्यादी वातावरणात आनेराजव्यास वाढल्याने, त्याचप्रकारचा यशाशक्ती प्रयत्न करण्याची महत्त्वाकांक्षा त्यांच्या ठिकाणी उत्पन्न झाली असावी, असे दिसते.

पूर्वकालीन अस्तित्वात असलेले न्याय दर्शनाचे व इतर दर्शन परंपरेतील ग्रंथ व आनेराज व्यास यांचे 'लक्षण रत्नाकर' यांचे तुलनात्मक निरीक्षण केले असता, असे लक्षात येते की, प्रतिज्ञा, प्रमाण, दृष्टांत ही लक्षणे वा पदे तर्कभाशेत आल्याचे दिसते. शिवाय प्रतिज्ञा, प्रमाण, दृष्टांत, उपपत्ती, व्यावृत्ती, न्याय, विरोधपरिहार ही पदे पूर्वमीमांसेत आलेली दिसतात. शिवाय संबंध, विशेषण, उत्सर्ग अपवाद हे व्याकरणाचे स्मरण होते, तर दृष्टांत, काको, कक्षा, भावार्थ, प्रकरण हे पाहून साहित्यशास्त्राची आठवण होते. तर विवर्तन्याय, परिणामन्याय हे वाचून वेदांत ग्रंथाची आठवण होते. याशिवाय याज्ञवल्क्य स्मृतीत धर्मनिर्णयाबाबत चर्चा चालू असताना खालील चौदा स्थानांचा उल्लेख आहे.

> ''पुराणन्याय मीमांसा धर्मशास्त्रांगामिश्रिता :
> वेदाः स्थानानि विधानां धर्मस्य च चतुदर्श ।।'' (याज्ञ. स्मृ., 1.3)

वरील, पुराण, तर्कशास्त्र मीमांसामन्वादी स्मृती, गौतमादी स्मृती, गौतमादी धर्मसूत्रे, शिक्षा, कल्प व्याकरणादी शडंगे आणि चार वेद, या चौदा स्थानांचा धर्मनिर्णयाशी असणारा संबंध प्रा. काणे यांनी धर्मशास्त्र विचार या ग्रंथात स्पष्ट केला आहे. या चौदा स्थानांकडे आनेराज व्यास यांचे लक्ष गेले असणे स्वाभाविक आहे. मात्र यावरून आनेराज व्यासांनी एखाद्या ग्रंथाचा अनुवाद करून लक्षणरत्नाकर केले असे म्हणणे चुकीचे ठरते. कारण यात विषयप्रदान व विषयप्रबोध सारखी नवीन लक्षणे दिसतात, की ज्यांचा उल्लेख पूर्वकालीन ग्रंथात काहीच दिसून येत नाही. शिवाय न्याय, वेदांत व इतर ठिकाणी वापरलेली लक्षणे व पदे यांचा तेथे अभिप्रेत असलेला अर्थ व आनेराज व्यास सांगत असलेला अर्थ भिन्न आहे.

आता आनेराज व्यास यांना 'लक्षणरत्नाकर' हा ग्रंथ लिहिण्याची कल्पना सुचली कोठून याबाबत ह. ना. नेने यांनी खालील परिच्छेदात मांडलेले मुद्दे विचार करण्यासारखे आहेत.5

'प्रथमतः आनेराजांचे लक्ष धर्मशास्त्राकडे जाणे साहजिक आहे. जैमिनीच्या द्वादशाध्यायी मीमासेला 'द्वादशलक्षणी' असे नाव आढळते. ('इह खलु महर्पिजैमिनिना द्वादशलक्षण्यां पूर्वमीमांसायां धर्माधर्मावेवानुष्ठानौ पयोगितया विचारितो' —मीमांसा परिभाषा) 'लक्ष्यन्ते ज्ञायन्ते पदार्था एभिः' अशा व्युपत्तीने बारा लक्षणे जींत आहेत, म्हणजे बारा अध्याय जींत आहेत अशी पूर्वमीमांसा. याप्रमाणेच 'द्वात्रिंशाल्लक्षणशास्त्र' किंवा 'लक्षणरत्नाकर' यामध्ये बत्तीस लक्षणांचा ऊहापोह धर्मनिर्णयार्थ केला असल्याने, ह्या ग्रंथात लहान लहान बत्तीस प्रकरणे आहेत असे म्हटल्यात हरकत नाही. तथापि, 'द्वात्रिंशलक्षणम्' असे नाव न देता, 'लक्षणरत्नाकर' असे अभिधान आनेराजांनी दिले हे लक्षात घेण्यासारखे आहे. नावावरून आपण जर मागमूस पाहू लागलो तर कौटिल्याच्या अर्थशास्त्रात 'द्वात्रिंशदाकारास्तन्त्रयुक्तयः' बत्तीस तंत्रयुक्ती म्हणजे वादोपयोगी प्रतिपादनाचे बत्तीस शास्त्रीय प्रकार आढळतात. वैद्यक ग्रंथांपैकी चरक व सुश्रुत संहिता यांमध्ये जवळजवळ अशाच पण चौतीस तंत्रयुक्तींची यादी आहे. पुढील नावे पाहिल्यास 'लक्षणरत्नाकरातील' लक्षणांची यादी त्याहून वेगळी आहे, असे दिसते.

1. अधिकरण,
2. विधान,
3. योग,
4. पदार्थ,
5. हेत्वर्थ,
6. उद्देश,
7. निर्देश,
8. उपदेश,
9. अपदेश,
10. अतिदेशे,
11. प्रदेश,
12. उपमान,
13. अर्थापत्ती,
14. संशय,
15. प्रसंग,
16. विपर्यय,
17. वाक्यशेष,
18. अनुमान,
19. व्याख्यान,
20. निर्वचन,
21. निदर्शन,
22. अपवर्ग,
23. स्वसंज्ञा,
24. पूर्वपक्ष,
25. उत्तरपक्ष,
26. एकान्त,
27. अनागतावेक्षण,
28. अतिक्रान्तावेक्षण,
29. नियोग,
30. विकल्प,
31. समुच्चय,
32. ऊह्य.

चरकसंहितेतील यादीत काही शब्द निराळे आहेत, जसे– प्रयोजन, निर्णय, अनेकान्त, प्रत्युच्चार, उद्धार, संभव इत्यादी.

चरससंहितेचा आठवा अध्याय. विमानस्थान, यामध्ये 'संभाषा' किंवा 'वादवीधि' सांगितला असून, त्यांत 44 वादमार्गांचे निरूपण आहे. त्यापैकी काही पारिभाषिक शब्द, लक्षणरत्नाकरातील लक्षणांप्रमाणे दिसतात. वाद, प्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष, समवाय, प्रतिज्ञा, स्थापना, प्रतिष्ठापना, हेतू, उपनय, निगमन, उत्तर, दृष्टांत, सिद्धान्त, शब्द, प्रत्यक्ष, अनुमान, औपम्य, ऐतिह्य, संशय, संशय, प्रयोजन, सव्यभिचार, जिज्ञासा, व्यवहार, संभव, अनुयोज्य, अनुनुयोज्य, अनुयोग, प्रत्यनुयोग, वाक्यशेष, वाक्यप्रशंसा, छल, अहेतू, अतीतकाल, उपालंभ, परिहार, प्रतिज्ञाहानी, अभ्यनुजा, हेत्वन्तर, अर्थान्तर, निग्रहस्थान. दिलेल्या शब्दांचा 'लक्षणरत्नाकर' व त्यावरील मराठी टीपग्रंथ यांमध्ये अनेक ठिकाणी उपयोग केला आहे. वैद्यक व अर्थशास्त्रापेक्षा, न्यायशास्त्र व तर्क यांवरील ग्रंथात वरील पारिभाषिक शब्द जागोजागी विपुलपणे आढळतात. त्यातील काहींची लक्षणेदेखील न्यायसूत्रकारांनी व टीपग्रंथकारांनी दिलेली आहेत. म्हणून काही लक्षणांच्या व्याख्यांची चिकित्सा, आनेराजांनी दिलेल्या लक्षणांच्या व्याख्यांशी तुलना करून पाहू.

1. प्रतिक्षा : साध्यनिर्देशः प्रतिज्ञा । 1–1–33, प्रतिपादिशया पक्षवचंन प्रतिज्ञा– न्यायसार, प्रतिज्ञा नाम साध्यवचनम्, चरकः पुरुषातें साधनीं प्रवर्तावया साध्यफळश्रुति बोलाविचि लागे तें प्रतिज्ञासूत्र– 'बत्तीस लक्षणाची टीप', फलश्रुतिवाक्यांते प्रतिज्ञा बोलिजे – पंचवार्तिक, वाक्कृतार्थकर्तृत्वशक्तिस्वरूपा प्रतिज्ञा– लक्षणरत्नाकर,
2. प्रमाण : सभ्यगनुभवसाधनं प्रमाणपट् न्यायसार, प्रमाकरणे प्रमाणम्' । यथार्थानुभवः प्रसा । साधकतमं कारणं करणम् । –तर्कभाशा, जेणे दृष्टादृष्ट अर्थाचें अनुभवज्ञान होएः तेआतें : प्रमाणसूत्र भजणी– पंचवार्तीक, फलश्रुतिश्रवणें फलप्राप्तिकरणें, प्रवर्तला जो पुरुषः त्यासि साधन आचरावयाः आप्तवाक्य होआवेंचि लागे तें प्रतिज्ञासूत्र– 'बत्तीस लक्षणाची टीप', : अभ्यगनुभवसाधनोपकारकं ब्रह्मविद्याख्यं प्रमाणम्– लक्षणरत्नाकर,
3. दृष्टांत : लैकिकपरीक्षणकाणां यस्मिन्नर्थें स दृष्टांतः – गौतम सूत्र 1.1.25, यत्र मुर्खविदुशां बुद्धीसाम्र्य यो वर्ण्य वर्णयति– चरकसंहिता, येन दृष्टः प्रमयान्तस्तं दृष्टांन्तं प्रचक्षते। – लक्षणरत्नाकर, जेथं दृष्टे करूनि अदृष्टार्थ बुझाविजे– पंचवार्तिक, दृष्टादृष्ट निरूपूनि तत्सादृष्येंदृष्टादृष्ट बुझाविजे– 'बत्तीस लक्षणाची टीप',
4. निर्णय : विमृष्यपक्षपक्षः भ्यामर्थावधारणं निर्णयः – गौतम सूत्र 1.1.41, निश्चयार्थो निर्णयः । शब्दसंप्रदायार्थहस्याख्यः । लक्षणरत्नाकर, यि सूत्रीं हीनाचिया व्यावृत्ती उचात्त्वा निर्धारू– पंचवार्तिक, यथायथमेव शब्दें सिद्धान्ते हीनाचिया व्यावृत्ती उबाचा निर्धारू – 'बत्तीस लक्षणाची टीप', वरील परिच्छेदातील, प्रतिज्ञा, प्रमाण, दृष्टान्त वा निर्णय, या लक्षणाची वा पदांची दिलेली व्याख्या पाहता असे लक्षात येते की, आनेराज व्यास यांनी या लक्षणाची वा पदांची नावे जरी इतर ग्रंथांतून घेतली असली, तरी त्यांना अभिप्रेत अर्थ हा भिन्न आहे. शिवाय आनेराज व्यास यांनी स्वतःही काही लक्षणांची भर टाकली असून, जी पूर्वीच्या ग्रंथात आढळून येत नाही. जसे की, विषयप्रदानत्व, विषय प्रबोध ही लक्षणे होय. याशिवाय या अर्थनिर्धारणाच्या पदार्थांची व्याख्या करताना, त्यांनी स्वतःच्या केलेल्या व्याख्या ह्या इतरांनी केलेल्या व्याख्यांपेक्षा दूर ठेवल्या आहेत. हे आनेराजांचे, त्यांच्या लेखकातील वैशिष्ट्या दिसून येते. जैन व बौद्ध दर्शनांतील, तर्कशास्त्र, ज्ञानशास्त्र वा साहित्याचा विचार केला असता खालील काही पदार्थ, पदे जी आनेराज व्यास त्यांच्या बत्तीस अर्थनिर्धारणातील पदार्थांतही आढळून येतात. ती पुढीलप्रमाणे होय.

1. प्रतिज्ञा
2. प्रमाण
3. दृष्टान्त
4. निशेध
5. न्याय
6. प्रकरण
7. अस्तित्व
8. पक्ष
9. कार्य
10. लक्षण
11. कारण
12. हेतू
13. संबंध.

मात्र या दर्शनांना वरील पदासाठी अभिप्रेत असलेला अर्थ व आनेराज व्यासांना अभिप्रेत असलेला अर्थ भिन्न असल्याचे दिसून येते. शिवाय, जसे वरील परिच्छेदात उल्लेख आला आहेच की, महानुवीय साहित्य व तात्विक विचार ग्रंथात वैद्यक व अर्थशास्त्रीयापेक्षा, न्यायशास्त्र व तर्क यांतील पारिभाषिक शब्द जागोजागी विपुलपणे आढळतात. यावर असे दिसून येते की महानुभावाच्या अर्थनिर्धारणशास्त्राचा विचार करताना न्याय दर्शनातील विचाराचा त्यावर प्रभाव

दिसून येतो.

निष्कर्ष, असे म्हणता येईल की, महानुभवांच्या अर्थनिर्धारणशास्त्रचे भारतीय अर्थनिर्धारणशास्त्राच्या परंपरेतील एक वैशिष्ट्यापूर्ण असे महत्त्वाचे स्थान आहे. देशी भाषकांमध्ये महानुभावाचे अर्थनिर्धारणशास्त्राचे योगदान एक महत्त्वपूर्ण ठरते ईश्वरी अवतारांची 'वचने' त्यावर चर्चा, त्या वचनांचा अर्थ लावण्यासाठी श्रीचक्रधरांनी स्वतः सांगितलेले 'अर्थनिर्धारणाचे' चार पदार्थ हे महत्त्वाचे वैशिष्ट्य, इतर दर्शन परंपरेत अशा स्वरूपात आपल्याला दिसून येत नाही. शिवाय काकु, कक्षा, प्रकरण व भावार्थ या चार अर्थनिर्धारण पदार्थांच्या मर्यादा लक्षात घेऊन, महानुभावीय भाष्यकारांनी हे चार अधिक अट्ठावीस एकून बत्तीस अर्थनिर्धारणाचे पदार्थांची भर घातली, हे देखील महानुभावांच्या अर्थनिर्धारणशास्त्राचे महत्त्वाचे वैशिष्ट्या ठरते. अर्थनिर्धारण करताना फक्त 'ग्रंथ', त्यातील भाषा, संस्कृती इत्यादींचा विचार न करता लेखकाची मानसिकता वा भावाचा विचार महत्त्वाचा आहे, हे महानुभवांच्या अर्थनिर्धारणशास्त्रातील विचार, पूर्वमीमांसक वा रिकरसारख्या तत्त्वचिंतकांच्या विचारांहून सर्वार्थाने भिन्न आहे. तुलनात्मक विचार करता, भारतीय दर्शनातील अर्थनिर्धारणाचे अनेक पदार्थ, महानुभवांच्या अर्थनिर्धारणशास्त्रात दिसून येतात, मात्र त्यात साम्य हे नाममात्र असून मुळतः त्याचे तत्त्व व सार हे इतर दर्शनांतील अर्थनिर्धारणशास्त्राहून भिन्न असल्याचे दिसते. पाश्चात्त्य अर्थनिर्धारणशास्त्राचा विचार करता, पॉल रिकरसारखे तत्त्वचिंतक लेखकांच्या भावापेक्षा 'पाठ्या'ला अर्थनिर्धारण करतात, अधिक महत्त्व देताना दिसतात. मात्र महानुभवांच्या अर्थनिर्धारणशास्त्राचा विचार करता, 'पाठ्या'पेक्षा लेखकाच्या 'भाव' वा मानसिकतेला अधिक महत्त्व दिल्याचे दिसून येते.

## *निष्कर्ष* ( Conclusion )

'अर्थनिर्धारणशास्त्र' म्हणजे येथे 'अर्थ' म्हणजे पैसा, संपत्ती नसून शब्द, वाक्य, ग्रंथ, घटना याचे योग्य 'अर्थ' (Interpretation) लावत असतात. न्यायदर्शन व महानुभाव संप्रदाय विविध मते मांडताना दिसतात. मात्र महानुभावाचे अर्थनिर्धारणशास्त्रात ज्याचे महत्त्वाचे योगदान आहे, ते भाष्यकारांनी, अनेक अर्थनिर्धारण करणारे पदार्थ व न्यायदर्शनातील, चरकसंहितेतील व मीमांसा दर्शनातील 'पद' यांच्यात साम्य दिसते. ते पदार्थ जरी तसेच (Identical) नसले तरी, अनेक भाष्यकाराचा न्यायदर्शना आगोदरच अभ्यास झाल्याचे दिसून येते. म्हणून महानुभावाचे अर्थनिर्धारणशास्त्राचा विचार करताना, न्यायदर्शनातील विचाराचा त्यावर प्रभाव दिसून येतो.

## *संदर्भसूचि :*


1. झा – पानसे उज्ज्वला (अनु.), 'जैमिनिसूत्र – शाबरभाष्य खण्ड – 1', रजिस्ट्रार, पुणे विद्यापीठ, पुणे – 07.
2. मेहेंदळे, मु. म., 'वेदार्थनिर्णयाचा इतिहास', भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे –04, पृ. 81.
3. मोरे सदानंद, 'तुकारामदर्शन' गाज प्रकाशन, अहमदनगर, 1196, पृ. 59.
4. कोळपकर मु. म., 'महानुभावांचा इतिहास', प्रथम आवृत्ती, श्रीनाथ प्रिंटिंग प्रेस, पुणे, 1979, पृ. 232.
5. नेने ह. ना. (संपा.), लक्षण रत्नाकर, सरस्वती प्रेस, अमरावती, 1937, उपोद्घात, पृ. 30.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net